महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक :** क्रमांक:२२५३/१४७७/(१)/उ.ता./२०२१/१६ **दिनांक :-** २७ जानेवारी, २०२२

## – घोषणा -

**विषय :-** राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०२१ या स्पर्धा परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक २३ जानेवारी, २०२२** रोजी घेण्यात आलेल्या **'राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०२१'** या स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपुस्तिका क्रमांक १ व प्रश्नपुस्तिका क्रमांक २ या विषयांच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकांच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. सदर परीक्षेमधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | संच A | संच B | संच C | संच D |
|---|---|---|---|---|
| **प्रश्नपुस्तिका क्रमांक २** | ६४ | ७० | ७२ | ६५ |
| | ६६ | ५७ | ६३ | ७४ |

३. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकातील तरतुदीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने प्रोफाईलद्वारे सादर करणे आवश्यक आहे. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

४. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई

ठिकाण : मुंबई